## महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ मार्च २०१२

### आदेश

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८.**

क्रमांक मुद्रांक. २००७/प्र.क्र.१९६ (४)/म-१.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने शासन निर्णय क्रमांक पीएसआय. १७०७/(सीआर ५०)/उद्योग-८, दिनांक ३१ जानेवारी २०१२ अन्वये सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ मध्ये सुधारणा करून सदर योजनेला दिनांक ३१ मार्च २०१२ पर्यंत मुदतवाढ दिली आहे.

त्याअर्थी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (१९५८ चा ६०) च्या कलम ९ च्या पोट-कलम (अ) अन्वये असलेल्या अधिकाराचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे शासन आदेश क्रमांक मुद्रांक २००७/प्र.क्र.१९६ (४)/म-१, दिनांक १२ जून २००७ अन्वये सामुहिक प्रोत्साहन योजना, २००७ च्या अंतर्गत (यापुढे त्याचा निर्देश उक्त आदेश असा करण्यात आला आहे) दिलेल्या मुद्रांक शुल्काच्या सवलतीची मुदत दिनांक १ फेब्रुवारी २०१२ ते दिनांक ३१ मार्च २०१२ या कालावधीपर्यंत वाढवित आहे. त्याकरिता उक्त आदेशात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :—

उक्त आदेशात परि. १ मध्ये " ३१ जानेवारी २०१२ रोजी संपणाऱ्या " **या ऐवजी** " ३१ मार्च २०१२ रोजी संपणाऱ्या " हा मजकूर दाखल करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश नार्वेकर,**
शासनाचे उप सचिव.